सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २२६ | शनिवार, दि. ०९ मे २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

## आजचे अभीष्टचिंतन





प्रा. डॉ. पोपट भराटे
अमळनेर



श्री. विशाल चौहान
पोलीस दल



श्री. विवेक मतकरी
पुणे

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवूया. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

**जय भारत...!**
**जय स्वदेशी...!!**

## दिनविशेष

९ मे

- विजेवर चालणारी टंकलेखन मशीन तयार करण्यात आली
- अटलांटा ग्रांप्री नेमबाजी स्पर्धेत भारताच्या रुपी उन्नीकृष्णनने प्रोन गटात रौप्यपदक पटकाविले.

# दुधाच्या पिशवीवरील निळ्या, हिरव्या, नारंगी रंगांचा अर्थ काय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जेव्हा तुम्ही दुकानात दूध खरेदी करण्यासाठी जाता तेव्हा तुम्हाला वेगवेगळ्या रंगांच्या निळा, हिरवा, नारंगी रंगाच्या दुधाच्या पिशव्या दिसत असतील. पहिल्यांदा पाहिल्यानंतर हे रंग फक्त पॅकेजिंगचा एक भाग असतील असे वाटते पण या रंगांमध्ये बरीच माहिती दडलेली असते. दुधाच्या पॅकेजिंगवरून दुधाचा दर्जाही समजत असतो. या रंगांच्या मागचे कारण आणि योग्य लॉजिक समजून घेऊ.

**१) निळा रंग (टोन्ड मिल्क)**

बाजारात सर्वाधिक विक्री होणाऱ्या पिशव्यांवर निळा रंग असतो. याला टोन्ड मिल्क म्हणतात. यामध्ये फॅटचे प्रमाण साधारणपणे ३ टक्के असते. गाईच्या दुधात पाणी आणि स्किम्ड मिल्क पावडर मिसळून हे दूध तयार केले जाते. ज्यांना वजन नियंत्रित ठेवायचे आहे किंवा ज्यांना जास्त फॅट असलेले दूध पचत नाही, त्यांच्यासाठी हे दूध उत्तम आहे. चहा, कॉफी किंवा रोजच्या वापरासाठी हे अत्यंत उपयुक्त मानले जाते.

**२) नारंगी रंग (फुल क्रीम मिल्क )**

नारंगी रंगाच्या पिशवीत फुल क्रीम दूध असते. यामध्ये फॅटचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ६ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असते. हे दूध अत्यंत घट्ट आणि पौष्टिक असते. वाढत्या वयाच्या मुलांसाठी, खेळाडूंसाठी किंवा ज्यांना वजन वाढवायचे आहे. त्यांच्यासाठी हे दूध फायदेशीर ठरते. या दुधापासून बनवलेले दही, बासुंदी किंवा खीर अतिशय चविष्ट लागते.

**३) हिरवा रंग (स्टँडर्डाइज्ड मिल्क )**

हिरव्या रंगाच्या पिशवीत स्टँडर्डाइज्ड दूध असते. यामध्ये फॅटचे प्रमाण साधारण ४.५ टक्के असते. हे दूध निळ्या आणि नारंगी रंगाच्या पिशवीतील दुधाचा मध्यम मार्ग आहे. हे ना जास्त पातळ असते ना जास्त घट्ट. मध्यम वयोगटातील व्यक्तींसाठी आणि ज्यांना संतुलित आहार हवा आहे, त्यांच्यासाठी हिरव्या पिशवीतील दूध हा एक चांगला पर्याय आहे.




### तुमच्यासाठी कोणते दूध योग्य...?

*दूध निवडताना तुमचे वय आणि शारीरिक गरज लक्षात घेणे आवश्यक आहे. जर तुम्हाला हृदयविकार किंवा कोलेस्ट्रॉलचा त्रास असेल, तर निळ्या पिशवीतील (टोन्ड) दूध निवडावे. जर घरात लहान मुले असतील, तर त्यांच्या बौद्धिक आणि शारीरिक विकासासाठी नारंगी पिशवीतील (फुल क्रीम) दूध देणे योग्य ठरते.*



अमळनेर : अनोरेदे परिसरात अवैध बंधारा व रस्ता हटवल्यानंतर पाहणी करताना नगराध्यक्ष डॉ. परिक्षित बाविस्कर यांच्यासह नगरपालिकेच्या पदाधिकारी .

# अमळनेरचा पाणीप्रश्न तात्पुरता मार्गी

## तापी नदीचे पाणी उपलब्ध झाल्याने समाधान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळोदकलाली पाणीपुरवठ्याचा जलस्तर कमी झाल्याने शहरात पाणीटंचाईची चिंता निर्माण झाली होती. मात्र तापी नदीत पाणी उपलब्ध झाल्याने पुढील काही दिवसांचा पाणीप्रश्न मार्गी लागला आहे.

अनोरेदे परिसरात अवैध बंधारा आणि रस्ता उभारल्यामुळे पाण्याचा प्रवाह अडथळित झाला होता. याची माहिती मिळताच नगराध्यक्ष डॉ.परीक्षित बाविस्कर यांनी उपाध्यक्ष प्रशांत निकम यांना तहसीलदार, मंडळ अधिकारी आणि संबंधित प्रशासनाशी संपर्क करण्याच्या सूचना दिल्या.

त्यानंतर तातडीने कारवाई करून अवैध बंधारा आणि रस्ता हटवण्यात आला व पाण्याचा प्रवाह पुन्हा सुरू करण्यात आला. दुपारी उपाध्यक्ष, सभापती आणि नगरसेवकांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तसेच तापी नदीच्या जळोद पात्रात पाणी साठवण्यासाठी तात्पुरता बंधारा उभारण्याच्या सूचनाही नगराध्यक्षांनी दिल्या.

सध्या मे महिन्यात प्रथमच जळोद येथील दोन्ही पंप पूर्ण क्षमतेने सुरू असून कलाली डोह सुरू करण्यात आलेला नसल्याची माहिती देण्यात आली. दरम्यान, लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांच्या नियोजनामुळे नगरपरिषदेला आवर्तनासाठी खर्च होणारे सुमारे ४५ ते ५० लाख रुपये वाचल्याचे पाणीपुरवठा सभापती कैलासतात्या पाटील यांनी सांगितले.

# सफाई कामगारांचा बुलंद आवाज : रघुनाथ मोरे पुन्हा एकदा प्रदेश सचिवपदी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : नगरपालिका व सफाई कामगारांच्या न्याय हक्कांसाठी सातत्याने लढा देणारे कामगार नेते रघुनाथ मोरे यांची अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेस या संघटनेच्या प्रदेश सचिवपदी पुन्हा एकदा फेरनिवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे कामगार वर्गात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मुंबई येथे नुकत्याच पार पडलेल्या संघटनेच्या महत्वपूर्ण बैठकीत ही घोषणा करण्यात आली. यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष गोविंदजी परमार आणि प्रदेश अध्यक्ष दिलीपअण्णा चांगरे यांच्या हस्ते रघुनाथ मोरे यांना अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.रघुनाथ मोरे यांनी अमळनेर नगरपरिषदेतील सफाई कामगारांसह जळगाव जिल्हा व राज्यभरातील कामगारांच्या विविध प्रश्नांवर सातत्याने लढा उभारला आहे. विशेषतः लाड-पागे समितीच्या शिफारशींनुसार वारसांना नोकरीत प्राधान्य मिळावे यासाठी त्यांनी शासन दरबारी प्रभावी पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांच्या वारसांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे.त्यांच्या या सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत संघटनेने त्यांच्यावर पुन्हा एकदा विश्वास दाखवला आहे. त्यांच्या फेरनिवडीमुळे अमळनेर शहरासह राज्यभरातील सफाई कामगारांनी आनंद व्यक्त करत त्यांना शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.

## उन्हाचा पारा वाढणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गेल्या दोन दिवसांपासून तालुक्यात ४१ अंशावर उन्हाचा पारा गेल्यानंतर पुढील दोन दिवस ४२ अंशापर्यंत तापमान वाढणार असल्याचे हवामान विभागाने कळविले आहे. आर्द्रता व वाढलेले तापमान यामुळे उष्णतेची दाहकता तीव्रतेने जाणवणार त्यामुळे नागरिकांना दुपारच्या वेळी बाहेर पडतांना काळजी घ्यावी असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आलेले आहेत.

## यादें आशाजी की मैफलीने रसिक मंत्रमुग्ध

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील जुना टाऊन हॉलमध्ये आयोजित यादें आशाजी की या विशेष संगीत मैफलीला अमळनेरकर रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या अजरामर गीतांनी सजलेल्या या कार्यक्रमाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजनाने झाली. यावेळी विद्या हजारे, तिलोत्तमा पाटील, माधुरी पाटील, सुलोचना वाघ, प्रा. शिला पाटील, प्रा. अशोक पवार, भाऊसाहेब देशमुख आणि राजेंद्रसिंग कालरा, प्रा. रंजना देशमुख यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. याच प्रसंगी स्वर संगीत ऑर्केस्ट्रा या नावाच्या फलकाचे अनावरण संगीत विशारद वसुंधरा लांडगे आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.जागृती केळकर, विद्या पाटील, पूनम पाटील, शुभांगी खंडाळे आणि प्रमिला पवार यांनी केव्हा तरी पहाटे, दम मारो दम, आओ हुजूर आणि रेशमाच्या रेघानी यांसारखी सोलो गाणी सादर केली. मिलिंद पाटील आणि देविदास बिरारी यांनी महिला कलाकारांसोबत जाने जा ढूंढता फिर रहा व आज रपट जाए सारखी प्रसिद्ध ड्युएट गीते गाऊन कार्यक्रमात रंगत भरली. कार्यक्रमाचे नियोजन मिलिंद पाटील यांनी केले, तर सूत्रसंचालन वसुंधरा लांडगे यांनी प्रभावीपणे केले.शेवटी सर्व कलाकारांनी सामूहिक गीत सादर करून आणि आशाजींना श्रद्धांजली वाहून या सुरेल मैफलीची सांगता केली.

# एमबीबीएस परीक्षा उत्तीर्ण डॉ. प्रसाद पाटील यांचा सत्कार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील नायब तहसीलदार सी. यू. पाटील यांचे सुपुत्र डॉ. प्रसाद पाटील यांनी एमबीबीएस परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल आमदार अनिलदादा पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.डॉ. प्रसाद पाटील यांनी वेदांत मेडिकल कॉलेज येथून एमबीबीएस शिक्षण पूर्ण केले आहे. यावेळी उपविभागीय अधिकारी मयूर भंगाळे, डीवाय.एस.पी. विनायक कोते, तहसीलदार रुपेशकुमार सुराणा, सी. यू. पाटील तसेच महसूल विभागातील कर्मचारी उपस्थित होते.डॉ. प्रसाद पाटील यांच्या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.



# नवरदेवासमोर दोनशेची नोट ठेवून विचारला प्रश्न

## उत्तर मिळताच नवरीने मोडले लग्न, असा कोणता होता प्रश्न?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

लग्न प्रत्येक मुलीच्या आयुष्यातील खास क्षण असतो. कारण त्या एका दिवसानंतर मुलीचे नवीन आयुष्य सुरू होणार असते. पण लग्न मंडपात एका मुलीसोबत असे काही झाले, की शेवटच्या क्षणी लग्न मोडण्यात आले. लग्न झाल्यानंतर मुलीच्या कुटुंबियांनी मुलीची पाठवणी करण्यास नकार दिला.



सर्वांत धक्कादायक गोष्ट म्हणजे दोनशे रुपयांमुळे नवऱ्याचे आणि त्यांच्या कुटुंबियाचे मोठे सत्य समोर आले जे प्रचंड हैराण करणारे होते. ही घटना बिहारमधील मुजफ्फरनगर येथे घडली आहे. नवरीने दोनशे रुपयांनी नोट समोर ठेवून असा प्रश्न विचारला. ज्यामुळे वाद टोकाला पोहोचला.

मिळालेल्या माहितीनुसार मनियारी परिसरात शुक्रवार, दि. १ मे रोजी रात्री वरात आली. पारंपरिक पद्धतीनुसार रात्रभर विधी सुरू राहिल्या. आनंदाने सर्व काही पार पडले. पण नवऱ्या मुलाच्या कुटुंबाने नवरीची आणि तिच्या कुटुंबियांची फसवणूक केली. ज्या मुलासोबत मुलीचे लग्न ठरले होते त्याला नवरदेव म्हणून आणलेच नव्हते. मुलीच्या घरच्यांना याबद्दल शंका होती. पण त्यांनी तो आपला भ्रम समजून गप्प बसले. शनिवार, दि. २ मे रोजी सकाळी पाठवणी समारंभाची तयारी सुरू झाली. त्याचवेळी एका महिलेने नवरदेवाला भेट म्हणून दोनशे रुपयांची नोट दिली. त्यासोबतच तिने विचारले, की या नोटेची किंमत किती आहे. नवरदेवाने पूर्ण आत्मविश्वासाने सांगितले, की ती दोन हजार रुपयांची नोट आहे. त्यानंतर दुसऱ्याच मुलाला नवरदेव बनवून आपली फसवणूक होत आहे, या घरच्यांच्या शंकेचे रूपांतर विश्वासात झाले. फसवणूक झाल्याचे नवरीच्या कुटुंबियांना कळाले. अशात दोन्ही कुटुंबियांमध्ये वाद झाले.

नवऱ्या मुलाच्या समजदारीवर अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले. ज्या पुरुषाला दोनशे आणि दोन हजार रुपयांतील फरक कळत नाही तो स्वतःच्या कुटुंबाची जबाबदारी कशी घेऊ शकतो, असा प्रश्न मुलीच्या कुटुंबियांनी उपस्थित केला. समोर आलेल्या माहितीनुसार मुलाचे दुसऱ्या ठिकाणी लग्न होत नव्हते म्हणून अशी फसवणूक करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. वाद टोकाला गेल्यानंतर कुटुंबियांनी मुलीची पाठवणी करण्यास नकार दिला.

### नाही झाली नवरीची पाठवणी

झालेल्या वादानंतर मुलीची पाठवणी करण्यात आली नाही. नवऱ्या मुलाचे कुटुंबीय देखील खाली मान घालून तेथून निघून गेले. घडलेल्या घटनेनंतर नातावाईकांमध्ये आणि शेजारच्यांमध्ये संतापाचे वातावरण आहे. मुलाच्या कुटुंबियांनी असे करायला नको होते, असे अनेकांचे म्हणणे आहे. नवरीला सांगण्यात आले, की नवरदेव दुसराच कोणीतरी आहे. जेव्हा लग्नाची वेळ झाली तेव्हा त्याचे कुटुंबीय दुसऱ्याच एका पुरुषाला घेऊन आले. त्यानंतर वधूने ते लग्न मोडले आणि कोणतेही पुढील संबंध ठेवण्यास नकार दिला. हे प्रकरण अद्याप पोलिसांना कळविण्यात आलेले नाही. पोलिसांनी सांगितल्यानुसार कोणतीही तक्रार दाखल होत नाही तोपर्यंत तक्रार दाखल करणार नाही.

आशिर्वाद रुपी शुभेच्छांचा वर्षाव

**आभार**

प्रिय... मित्र, नातेवाईक व सहकारी सस्नेह नमस्कार, आपण सर्वांनी माझ्या जन्म दिनाच्या आठवणीने भेटून, फोनद्वारे सद्कामना दिल्यात, तुम्ही सर्वजण जगण्यातील आनंदाचं बळ आहात, हे मला मिळत राहील... या इच्छेसह स्नेह ऋणी आहे. ..

आपला स्नेही
दत्तात्रय निकम,
पोलीस निरिक्षक, अमळनेर



## संपादकीय

### हे मरण कधी थांबणार?

पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे ४ वर्षीय चिमुकलीवर ६५ वर्षांच्या नराधमाने केलेले किळसवाणे क्रौर्य आणि त्यानंतर दगडाने ठेचून केलेली तिची निर्घृण हत्या, ही केवळ एक गुन्हेगारी घटना नाही; तर आपल्या समाजाच्या नैतिक अधःपतनाचा कळस आहे. त्या चिमुकलीचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली लपवून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न करणाऱ्या नराधमाची ही विकृती पाहून संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला आहे. ही घटना ताजी असतानाच चाकणजवळील म्हाळुंगे येथे एका ३ वर्षीय बालकावर झालेला अनैतिक अत्याचार आणि त्याची गळा चिरून केलेली हत्या, या घटनांनी महाराष्ट्राच्या संतभूमी या प्रतिमेला काळिमा फासला आहे.राज्यात महिला आणि बाल सुरक्षा किती धोक्यात आहे, हे पोलीस दलाच्या अधिकृत आकडेवारीवरून स्पष्ट होते. जेव्हा आपण म्हणतो की राज्यात दररोज सरासरी २७ चिमुकल्या वासनेच्या बळी ठरत आहेत, तेव्हा ती केवळ संख्या नसते, तर तो व्यवस्थेचा पराभव असतो.दर ५३ मिनिटांला एका अल्पवयीन मुलीवर अत्याचाराचा गुन्हा दाखल होत आहे. म्हणजे हे वाचून पूर्ण होईपर्यंत कुठेतरी एका कोवळ्या जिवाचे आयुष्य उद्ध्वस्त झालेले असते.१ जानेवारी २०२५ ते एप्रिल २०२६ या काळात तब्बल १३,४१० गुन्हे दाखल झाले आहेत.विद्येचे माहेरघर मानल्या जाणाऱ्या पुण्यात ग्रामीण भागात १४०, तर शहर हद्दीत १८१ गुन्हे चार महिन्यांत नोंदवले गेले. पिंपरी-चिंचवडमध्येही ११८ गुन्हे दाखल आहेत. हे आकडे शहराच्या सुरक्षेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे करतात. केवळ पुणेच नव्हे, तर उत्तर महाराष्ट्राचे महत्त्वाचे केंद्र असलेल्या जळगाव जिल्ह्यातही चिमुकल्यांची सुरक्षा रामभरोसे असल्याचे भीषण वास्तव समोर आले आहे.जळगाव शहरातील अयोध्या नगर परिसरात एका १७ वर्षीय मुलीचे हात बांधून तिला लाकडी काठीने बेदम मारहाण करत अत्याचार केल्याची घटना एप्रिल २०२६ मध्ये उघडकीस आली. तसेच पाचोरा येथेही दोन तरुणांनी १७ वर्षीय मुलीला ब्लॅकमेल करून सामूहिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना घडली.

पुण्यात जशी दररोज सरासरी २७ प्रकरणे समोर येत आहेत, तशीच स्थिती जळगाव जिल्ह्यातही आहे. जळगाव जिल्ह्यात गेल्या वर्षभरात २०२५-२६ पोकसो अंतर्गत गुन्ह्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. ग्रामीण भागात संवादाच्या अभावामुळे आणि शहरात तंत्रज्ञानाचा (सोशल मीडिया) गैरवापर करून मुलींना जाळ्यात ओढण्याचे प्रमाण वाढले आहे.राज्यात दर ५३ मिनिटांला एका चिमुकलीवर अत्याचार होतो, यात जळगावसारख्या जिल्ह्यांचा वाटाही चिंताजनक आहे. १ जानेवारी २०२५ पासून आतापर्यंत राज्यात १३ हजार ४१० गुन्हे दाखल झाले असून, त्यात पुणे आणि जळगाव यांसारख्या मोठ्या जिल्ह्यांमधील आकडेवारी सर्वाधिक आहे.पोलीस विभाग तपास करतो, आरोपींना पकडतो; मात्र खरी अडचण येते ती न्यायालयीन प्रक्रियेत. कायद्याच्या अंमलबजावणीतील कासवाचा वेग गुन्हेगारांचे धाडस वाढवत आहे.अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये तारीख पे तारीख ही पद्धत पीडितेसाठी दुसऱ्यांदा होणाऱ्या अत्याचारासारखी असते. जळगावसह राज्यातील सर्वच जिल्ह्यांत या प्रकरणांचा निकाल विशेष फास्ट ट्रॅक कोर्टाच्या माध्यमातून ३ ते ६ महिन्यांत लावण्याची यंत्रणा उभी हवी.शक्ती कायद्याचे घोंगडे भिजत का? महाराष्ट्राने संमत केलेला शक्ती कायदा ज्यामध्ये २१ दिवसांत फाशीची तरतूद आहे, तो अद्याप केंद्राकडे अंतिम मंजुरीसाठी प्रलंबित असणे हे राज्याचे दुर्दैव आहे. जर हा कायदा आज लागू असता, तर नसरापूरच्या किंवा जळगावच्या नराधमांच्या मनात फाशीचा धाक निर्माण झाला असता.

राज्याला खैरातसारख्या भोंदूबाबांनी आणि विकृत मनोवृत्तीच्या गुन्हेगारांनी विळखा घातला आहे. धर्माच्या नावाखाली शोषण करणारे आणि चिमुकल्यांचा बळी घेणारे हे भोंदू जोपर्यंत सार्वजनिक चौकात फासावर लटकावले जात नाहीत, तोपर्यंत ही कीड संपणार नाही.या काळोखात सरकारने एक सकारात्मक पाऊल उचलले आहे. लेडी सुपरकॉप म्हणून ओळखल्या जाणाऱ्या निवृत्त आयपीएस अधिकारी मीरा बोरवणकर यांची महाराष्ट्र महिला आयोगाच्या अध्यक्षपदी झालेली निवड स्वागतार्ह आहे. त्यांच्या धाडसी आणि शिस्तबद्ध कार्यपद्धतीमुळे महिला आणि बालकांच्या प्रकरणांना गती मिळेल, अशी अपेक्षा आहे.केवळ मेणबत्त्या पेटवून किंवा सोशल मीडियावर संताप व्यक्त करून हे सत्र थांबणार नाही.सरकारने पोलीस विभागाला अशा नराधमांविरुद्ध शून्य सहिष्णुता धोरण राबवण्यासाठी खुली सूट द्यावी.शाळा आणि वस्त्यांमध्ये गुड टच-बॅड टच बद्दलची जनजागृती युद्धपातळीवर राबवली पाहिजे.जळगाव आणि पुण्याच्या घटनांनंतर आता गुन्हेगारांना समाजात वावरताना कायद्याची भीती वाटलीच पाहिजे, इतकी कठोर जरब बसवणे ही काळाची गरज आहे.जर आज आपण या विकृतीला ठेचले नाही, तर उद्याचे भवितव्य अंधकारमय असेल. चिमुकल्यांना खरी श्रद्धांजली तेव्हाच मिळेल, जेव्हा नराधमांना फाशीचा दोर मिळेल!

## वडा पावच्या गाडीवर तिघांचा धिंगाणा; चांदीची चेन ओढून नेली

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : वडा पावच्या गाडीवर येऊन धिंगाणा घालून एकाच्या गळ्यातील १५०० रुपये किमतीची चांदीची चैन तिघांनी हिसकावून नेल्याची घटना ६ रोजी सायंकाळी साडे सात वाजेच्या सुमारास घडली. गणेश प्रवीण पवार रा.कुलगुरू मंगल कार्यालयाच्या मागे याच्या भावाची गंगाघाट येथे वडापावची गाडी असून ६ रोजी संध्याकाळी गौरव कैलास सोनार, हर्षल बागुल उर्फ बंटी शिंपी दोघे मोटरसायकलवर आले आणि जोरजोरत शिवीगाळ करून मोटरसायकल रेस करत होते.

काही वेळाने ते निघून गेल्यानंतर भाऊ शिवम याने कैलास सोनार याना त्यांच्या मुलाबद्दल तक्रार करून वडिलांसोबत पोलीस स्टेशनला तक्रार द्यायला गेले. थोड्या वेळानंतर पुन्हा गौरव , हर्षल आणि दीपेश उर्फ बंटी महाजन तिघे मोटरसायकलवर आले.त्यावेळी गणेशने व्हिडीओ काढण्यासाठी मोबाईल चालू केला असता तू व्हिडीओ का काढतो म्हणत मोबाईल हिसकावू लागले. लगेच दोघांनी लाथा बुयांनी मारहाण सुरू केली. गौरवने तुझ्या दुकानांचे नाव किंग वडा पाव आहे म्हणून तुम्ही बादशहा झाले का? असे म्हणत तिघे अमळनेरचे बाप आहोत, कट्ट्याने तुमच्या दोघांचा गेम करून टाकू? असे म्हणत गळ्यातील तीन भारची १५०० रुपयांची चांदीची चेन हिसकावून पळून गेले. गणेशने अमळनेर पोलीस स्टेशनला फिर्याद दिल्यावरून तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

## गांधी अभ्यासात कसे होते?

### त्यांचा दहावीचा निकाल करेल आश्चर्यचकित



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारताच्या स्वातंत्र्याचे नेतृत्व करणारे महात्मा गांधी एक महान नेते म्हणून ओळखले जातात. पण त्यांच्या शैक्षणिक कामगिरीबद्दल जाणून तुम्हाला नक्कीच धक्का बसेल. गांधीजींनी मॅट्रिकची परीक्षा दिली, जी आता दहावीच्या समकक्ष मानली जाते. असे दिसून येते की त्या परीक्षेत त्यांना सरासरी गुण मिळाले होते. अहवालानुसार आणि त्यांच्या आत्मचरित्रानुसार, त्यांना इंग्रजीमध्ये चांगले ८९ गुण मिळाले, परंतु गणित आणि इतर विषयांमध्ये कमी गुण मिळाले. एकूणच, त्यांची कामगिरी एका सरासरी विद्यार्थ्यासारखी होती. गांधीजींना विशेषतः गणितामध्ये संघर्ष करावा लागला. ते इंग्रजीमध्ये उत्कृष्ट होते, ज्यामुळे त्यांचा एकूण निकाल संतुलित झाला. गांधीजींना गुजरातीमध्ये ४५, गणितामध्ये ५९ आणि इतिहासात फक्त २० गुण मिळाले. त्यांच्या दहावीच्या परीक्षेत, गांधीजींना विज्ञानात फक्त ३४ आणि सामान्य ज्ञानात ५४ गुण मिळाले. असे दिसून येते की गांधीजींना ६२५ पैकी फक्त २४७.५ गुण मिळाले. याचा अर्थ असा की वर्गातील इतर विद्यार्थ्यांच्या तुलनेत त्यांची कामगिरी सरासरी होती. त्यांच्या माझे सत्याचे प्रयोग या आत्मचरित्रात त्यांनी स्वतः कबूल केले आहे की ते एक असामान्य विद्यार्थी नव्हते. या माहितीचा हा सर्वात विश्वसनीय स्रोत मानला जातो. आज, भारतातील दहावीचे टॉपर ९५ टक्केपेक्षा जास्त गुण मिळवतात. त्या तुलनेत गांधींची कामगिरी सरासरी होती, यावरून हे दिसून येते की गुण हेच सर्वस्व नसतात.





## थलपती विजयला दहावीत किती गुण होते? मार्कलिस्ट व्हायरल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तामिळनाडुत पहिल्याच निवडणुकीत अभिनेता थलपतीच्या टीव्हीके पक्षाने घवघवीत यश मिळवले आहे. मात्र हाच थलपती विजय दहावीच्या परीक्षेत काही विषयात काठावर पास होता.बहुमताचा आकडा गाठता न आल्याने विजयचे सत्तास्थापनेचे गणित अद्याप जुळलेले नाही. गणिताचा आणि त्याचा शाळेपासूनच ३६चा आकडा आहे.थलपती विजयचे दहावीचे गुणपत्रक आता व्हायरल होत आहे. त्या गुणपत्रकानुसार विजयला दहावीत ११०० पैकी ७११ गुण मिळाले होते.

तामिळ भाषेत २०० पैकी १५५, इंग्रजीत २०० पैकी १३३ तर विज्ञानात ३०० पैकी २०६ गुण विजयने मिळवले होते.सामाजिक विज्ञान आणि गणितात त्याला कमी गुण होते. सामाजिक विज्ञानात २०० पैकी १२२ तर गणितात २०० पैकी फक्त ९५ गुण तो मिळवू शकला होता.विजयने हायस्कूलचे शिक्षण झाल्यानंतर लोयोला कॉलेजमध्ये व्हिज्युअल कम्युनिकेशनसाठी प्रवेश घेतला होता. पण चित्रपटसृष्टीत करिअरसाठी त्याने कॉलेज अर्धवट सोडले.तीन दशकांपेक्षा जास्त काळ चित्रपटसृष्टी गाजवल्यानंतर विजयने दोन वर्षांपूर्वी टीव्हीके पक्षाची घोषणा केली.विजयचा शेवटचा चित्रपट जन नायकन हा मानला जात आहे. तो अद्याप प्रदर्शित झालेला नाही. या चित्रपटात पूजा हेगडे, बॉबी देओल, प्रकाश राज यांसह इतर कलाकार आहेत.



## खोटे आश्वासन, मानसिक वेदना, अपमान... विजयच्या पत्नीने कोर्टात केले गंभीर आरोप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दाक्षिणात्य अभिनेता थलपती विजय गेल्या काही दिवसांपासून त्याच्या खासगी आणि राजकीय आयुष्यामुळे चर्चेत आहे. अभिनेता सध्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्याच्या तयारीत आहे. ४ मे रोजी पार पडलेल्या निवडणुकीतील निकालात त्याच्या पक्षाला मोठ्या प्रमाणात मते मिळाली आणि सर्वाधिक जागा जिंकत सत्ता मिळवली. परंतु, राजकीय वर्तुळात विजय अनेकांच्या चर्चेचा विषय असताना दुसरीकडे त्याच्या खासगी आयुष्याबद्दलही वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत.

संसारात आणि मुलांच्या संगोपनात व्यग्र असलेल्या संगीतासाठी विजय सर्वस्व होता. मात्र, तब्बल २७ वर्षांचा हा संसार आता घटस्फोटाच्या टप्प्यावर येऊन पोहोचला आहे. एकेकाळी विजयचे प्रेम असलेल्या संगीता यांनी घटस्फोटाची याचिका दाखल करताना सासरच्या घरात राहण्याचा अधिकार मागितला आहे. कायदेशीर प्रक्रिया सुरू असताना स्वतःला घराबाहेर राहावे लागू नये, यासाठी त्यांनी न्यायालयात तात्पुरता दिलासा मागितला आहे. संगीता यांनी केलेल्या आरोपांमधील पहिला आरोप हा आहे की, ५१ वर्षीय विजयचे एका अभिनेत्रीशी विवाहबाह्य संबंध होते. याचिकेनुसार, २०२१ मध्ये संगीता यांना विजय एका अभिनेत्रीबरोबर नात्यात असल्याचे समजले होते.संगीता यांनी पुढे आपल्या दुसरा आरोप करत म्हटले आहे की, विजय यांनी हे नाते संपवण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, त्या आश्वासनानंतरही कोणताही पश्चाताप न करता अभिनेत्रीबरोबरचे संबंध त्यांनी कायम ठेवले.विजयच्या पत्नीने पुढे असाही दावा केला की विजयने केवळ संगीताला आपल्या सामाजिक आणि वैयक्तिक आयुष्यातून दूर केले नाही, तर तो कथित अभिनेत्रीबरोबर परदेश दौरे आणि सार्वजनिक कार्यक्रमांमध्येही सहभागी होत असतो. त्या अभिनेत्रीने या प्रवासाचे फोटो अनेकदा सोशल मीडियावर शेअर केले. मात्र, विजयने या पोस्ट्सवर आक्षेप घेतला नाही. त्यामुळे त्याने अप्रत्यक्षपणे या गोष्टींना पाठिंबा दिल्याचे दिसत असल्याचे संगीता यांनी म्हटले आहे. तसेच, अशा सोशल मीडिया पोस्ट्समुळे त्यांना आणि त्यांच्या मुलांना वारंवार अपमान सहन करावा लागल्याचेही त्यांनी आपल्या याचिकेत नमूद केले आहे.

संगीता यांनी न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत असेही म्हटले आहे की, विजयने त्यांना आधी मिळणाऱ्या अनेक सुविधा काढून घेतल्या आहेत. इतकेच नाही, तर त्यांच्या मुक्तपणे येण्या-जाण्यावरही मर्यादा घालण्यात आल्या असून आर्थिक निर्बंधही लावले गेले आहेत.संगीता यांनी विजयवर पाचवा आरोप असा केला आहे की २०२४ मध्ये विजयच्या कथित विवाहबाह्य वागणुकीमुळे आणि सोशल मीडियावर वारंवार झालेल्या वादांमुळे त्यांना गंभीर मानसिक त्रास सहन करावा लागला. संगीता यांनी न्यायालयाला स्पष्ट सांगितले की, त्यांचे लग्न प्रत्यक्षात पूर्णपणे तुटले असून ते फक्त कागदोपत्रीच उरले आहे. संगीताच्या म्हणण्यानुसार, हे नाते पुन्हा पूर्वीसारखे होणे अशक्य आहे आणि या संबंधातून त्यांना मानसिक वेदना, अपमान, तिरस्कार आणि दुःख याशिवाय काहीच मिळाले नाही.

संगीता या श्रीलंकेतील एका तमिळ व्यावसायिकाच्या कन्या आहेत आणि त्या यूकेमध्ये राहत होत्या. त्या एकेकाळी विजयच्या मोठ्या चाहत्या होत्या. यूकेहून चेन्नईत आलेल्या संगीता यांनी विजयची भेट घेऊन त्याचे कौतुक करण्याचा विचार केला आणि त्या चित्रपटाच्या सेटवर पोहोचल्या. याच भेटीतून दोघांची ओळख वाढली आणि पुढे त्याचे रूपांतर लग्नात झाले. २५ ऑगस्ट १९९९ रोजी विजय आणि संगीताचे लग्न झाले. एका चाहतीने आपल्या आवडत्या अभिनेत्याशी लग्न केल्यामुळे हा लग्नसोहळा त्या काळात खूप चर्चेत राहिला होता.



## ५१ व्या वर्षीही सुपरफिट थलपती विजय !

### कोणता डाएट फॉलो केला? एका गोष्टीपासून ठेवले अंतर..

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दक्षिण सुपरस्टार विजय उर्फ थलपती विजय ५१ व्या वर्षीही अफाट फिटनेसने चाहत्यांना थक्क करत आहेत. दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीतील सुपरस्टार आणि राजकारणातही सक्रिय झालेले विजय ऊर्फ थलपती विजय हे त्यांच्या अभिनयासोबतच फिटनेससाठीही चर्चेत असतात. ५१ वर्षांच्या वयातही त्यांची ऊर्जा, शरीरयष्टी आणि स्क्रीनवरील उपस्थिती पाहून चाहते थक्क होतात. पण, त्यांच्या या जबरदस्त फिटनेसचं रहस्य काय आहे? यामागे दडलेली कहाणी हळूहळू उलगडत जाते...सगळ्यांच्या मनात एकच प्रश्न विजय इतकी वर्ष सतत एवढे फिट कसे राहतात? उत्तर साधे आहे; पण तितकेच शिस्तबद्ध आणि कठोरही. त्यांच्या लाइफस्टाईलमध्ये कोणतीही ढिलाई नाही. शूटिंग असो वा राजकीय कार्यक्रम, ते आपल्या दिनचर्येपासून कधीही दूर जात नाहीत.फिटनेस ट्रेनर नरेश कुमार यांच्या माहितीनुसार, थलपती विजय त्यांच्या खाण्यापिण्याबाबत कधीही तडजोड करत नाहीत. ते अनेकदा स्वतःचा घरचा डबा सोबत घेऊन प्रवास करतात. बाहेरचे तळलेले, मसालेदार आणि जंक फूड ते जवळजवळ पूर्णपणे टाळतात.त्यांचा ठाम विश्वास आहे.फक्त व्यायाम नाही, तर योग्य आहारच फिटनेसची खरी गुरुकिल्ली आहे.आजच्या वेगवान जीवनशैलीत जंक फूड सहज मिळते; पण थलपती विजय त्यापासून मुद्दाम दूर राहतात. कारण अशा अन्नात जास्त तेल, मीठ आणि प्रक्रिया केलेले घटक असतात, जे शरीरासाठी हानिकारक ठरू शकतात. त्यामुळे थकवा, वजनवाढ आणि सुस्ती यांसारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे ते नेहमी घरगुती आणि पौष्टिक आहारालाच प्राधान्य देतात.

## मधमाश्यांचे पोळे काढताना मुलगा अडकला, अजगराच्या भीतीने बचावकार्याला विलंब

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ओडिशाच्या नयागड जिल्ह्यात १४ वर्षीय शिवा प्रधान त्याच्या काकासोबत मधमाश्यांचे पोळे काढताना दगडांच्या फटीत अडकला. याच दगडांच्या फटीमध्ये अजगर फिरत असल्याने, बचावकार्य अतिशय जपून करावे लागले होते. या मुलाला बाहेर काढण्यासाठी तब्बल सहा तासांचा कालावधी लागला. ही घटना बुधवारी ओडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कनीपाडा जंगलात घडली.



शिवा प्रधान नावाचा मुलगा आपल्या काकांसोबत मध गोळा करण्यासाठी जंगलात गेला होता. मधमाश्यांचे पोळे काढताना तो एका मोठ्या दगडाच्या अरुंद फटीत शिरला आणि त्यातच अडकला.शिवा हा बाहेर येऊ शकत नाही हे लक्षात आल्यानंतर त्याच्या काकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली. माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या पथकांनी घटनास्थळी पोहोचून बचावकार्य सुरू केले. मात्र परिसर डोंगराळ आणि दुर्गम असल्याने बचावकार्य सोपे नव्हते. मुलगा अडकला त्याचदरम्यान दगडाच्या फटीजवळ अजगर आणि मधमाश्यांचा थवा देखील दिसत होता. त्यामुळेच बचाव पथकाला अत्यंत सावधगिरीने काम करावे लागत होते. भुवनेश्वर, पुरी आणि नयागड येथील अग्निशमन दलाची पथके या मोहिमेत सहभागी झाली होती.

आधुनिक उपकरणांच्या मदतीने दगड सावधपणे हलवण्यात आले आणि अखेर सहा तासांच्या प्रयत्नांनंतर मुलाला सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले.यानंतर शिवा प्रधानला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. सुदैवाने त्याला कोणतीही गंभीर दुखापत झाली नाही. या मोहिमेत सहभागी झालेल्या सुमारे ४० अग्निशमन कर्मचाऱ्यांचे ओडिशा फायर अँड इमर्जन्सी सर्व्हिसेसचे महासंचालक सुधांशु सारंगी यांनी कौतुक केले असून, संपूर्ण पथकाला २५ हजार रुपयांचे रोख बक्षीस जाहीर करण्यात आले आहे.


## मराठी भाषेचे पाणिनी : दादोबा पांडुरंग तर्खडकर

**जन्मदिन विशेष**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दादोबा पांडुरंग तर्खडकर (९ मे १८१४ १७ ऑक्टोबर १८८२) हे एक थोर मराठी व्याकरणकार, लेखक, भाषातज्ज्ञ आणि समाजसुधारक होते. मराठी भाषेच्या व्याकरणावर त्यांनी केलेल्या मूलभूत कार्यामुळे त्यांना मराठी भाषेचे पाणिनी असे गौरवाने संबोधले जाते.

दादोबांनी १८३६ मध्ये महाराष्ट्र भाषेचे व्याकरण हा ग्रंथ लिहिला. त्या काळी मराठी भाषेला शास्त्रीय शिस्त लावण्याचे आणि व्याकरणाचे नियम सुस्पष्ट करण्याचे मोठे काम त्यांनी या ग्रंथाद्वारे केले. म्हणूनच त्यांना प्राचीन संस्कृत व्याकरणकार पाणिनी यांची उपमा दिली जाते.दादोबा केवळ विद्वान लेखक नव्हते, तर ते एक पुरोगामी विचारवंतही होते. त्यांनी समाजातील जातिभेद आणि अंधश्रद्धा दूर करण्यासाठी महत्त्वपूर्ण संस्था स्थापन केल्या. सुरत येथे दुर्गाराम मंचाराम यांच्या सहकार्याने त्यांनी ही सभा स्थापन केली. ईश्वर एक आहे आणि सर्व मनुष्यजात एकच आहे हा या सभेचा मुख्य विचार होता. मुंबईत गुप्तपणे या सभेची स्थापना करण्यात आली. जातिभेद मोडीत काढणे आणि मूर्तिपूजेला विरोध करणे ही या सभेची मुख्य उद्दिष्टे होती.त्यांनी मुंबईच्या एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूटमध्ये शिक्षक म्हणून काम केले.तसेच, त्यांनी जावरा संस्थानाचे नवाब आणि बडोदा संस्थानाचे महाराज यांचे शिक्षक म्हणूनही जबाबदारी सांभाळली.प्रशासकीय सेवेत असताना त्यांनी डेप्युटी कलेक्टर म्हणूनही काम पाहिले. १८५७ च्या उठावादरम्यान नगर जिल्ह्यात त्यांनी बजावलेल्या कामगिरीबद्दल ब्रिटीश सरकारने त्यांना रावबहादूर ही पदवी दिली.दादोबांनी मराठी आणि इंग्रजी दोन्ही भाषांतून लेखन केले. त्यांची काही प्रमुख पुस्तके महाराष्ट्र भाषेचे व्याकरण.यशोदा पांडुरंगी हा मोरोपंतांच्या केकावलीवर त्यांनी लिहिलेला विस्तृत टीकाग्रंथ आहे.धर्मविवेचन मानवधर्म सभेच्या तत्त्वांचे विवेचन करणारा ग्रंथ.परमहंसिक ब्राह्मधर्म धार्मिक विचारांवरील पुस्तक.त्यांच्या मृत्यूनंतर प्रकाशित झालेले आत्मचरित्र हे चरित्र त्या काळातील सामाजिक स्थितीवर प्रकाश टाकते.दादोबांनी केवळ व्याकरणच लिहिले नाही, तर मराठी लेखनात शुद्धता आणि स्पष्टता असावी यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले. त्यांनी मराठी शुद्धलेखनाचे नियम अधिक सोपे आणि तर्कसंगत बनवले.दादोबा पांडुरंग तर्खडकर हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि वैचारिक पुनर्जागरणातील एक आधारस्तंभ मानले जातात. त्यांनी घातलेल्या व्याकरणाच्या पायावरच आजची आधुनिक मराठी भाषा उभी आहे.



हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com




# १० साल की उम्र में मां को खोया, आशीष की यूपीएससी कहानी दिल छू लेगी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सक्सेस स्टोरी

आशीष शर्मा ने बचपन में मां को खो दिया था। मां का सपना पूरा करने के लिए उन्होंने ६ साल तक कठिन मेहनत की और पांचवें प्रयास में संघ लोक सेवा आयोग परीक्षा में १८६ वीं रैंक हासिल कर अफसर बन गए। कुछ सपने ऐसे होते हैं जो इंसान अपने लिए नहीं बल्कि अपने अपनों के लिए जीता है। आशीष शर्मा की कहानी भी कुछ ऐसी ही है। बचपन में मां को खोने वाले इस बेटे ने उनकी आखिरी इच्छा को अपनी जिंदगी का लक्ष्य बना लिया। आशीष जब सिर्फ १० साल के थे तभी उनकी मां का निधन हो गया। इतनी छोटी उम्र में मां का साथ छूट जाना उनके लिए सबसे बड़ा दुख था। लेकिन मां का एक सपना हमेशा उनके दिल में जिंदा रहा, उन्हें बड़ा अफसर बनते देखने का सपना। आशीष बताते हैं कि १०वीं कक्षा से ही उन्होंने तय कर लिया था कि उन्हें संघ लोक सेवा आयोग यानी यूपीएससी की परीक्षा देनी है। मां की याद और उनका सपना समय के साथ और मजबूत होता चला गया। छह साल की कठिन मेहनत, ५ प्रयास के बाद आशीष ने यूपीएससी सिविल सेवा परीक्षा में १८६वीं रैंक हासिल की।



आशीष ने ग्वालियर के जी.डी. गोयनका स्कूल से पढ़ाई की। इसके बाद जीवाजी विश्वविद्यालय से राजनीति विज्ञान, इतिहास और समाजशास्त्र में स्नातक किया। परीक्षा की तैयारी के दौरान उन्होंने वैकल्पिक विषय के रूप में मानवशास्त्र चुना। यह फैसला थोड़ा अलग था, क्योंकि ज्यादातर विद्यार्थी दूसरे पारंपरिक विषय चुनते हैं। लेकिन आशीष कुछ नया पढ़ना चाहते थे। १२वीं में जीव विज्ञान पढ़ने की वजह से उन्हें यह विषय समझने में भी आसानी हुई। बाद में यही विषय उनकी सबसे बड़ी ताकत बना।संघ लोक सेवा आयोग की यात्रा आशीष के लिए आसान नहीं रही। पहली ही कोशिश में उन्होंने प्रारंभिक परीक्षा और मुख्य परीक्षा पास कर ली थी। वे साक्षात्कार तक भी पहुंचे, लेकिन अंतिम सूची में उनका नाम सिर्फ २० अंकों से पीछे रह गया। यह उनके लिए बड़ा झटका था। इसके बाद भी उन्होंने हिम्मत नहीं हारी। लगातार मेहनत जारी रखी। तीसरे प्रयास में फिर साक्षात्कार तक पहुंचे, लेकिन सफलता नहीं मिली। समय बीतता गया और पांचवां प्रयास उनके जीवन का सबसे महत्वपूर्ण मोड़ बन गया। यह उनका लगभग आखिरी मौका था। इस बार उन्होंने अपनी तैयारी का तरीका बदल दिया।आशीष को समझ आ गया था कि उन्हें मुख्य परीक्षा में सबसे ज्यादा सुधार करना होगा। उन्होंने जवाब लिखने की शैली पर विशेष ध्यान देना शुरू किया। पहले वे छोटे जवाब लिखते थे, लेकिन इस बार उन्होंने हर उत्तर को ज्यादा विस्तार और बेहतर ढंग से लिखना शुरू किया। उत्तरों में अधिक बिंदु, चित्र, नक्शे और सारणी जोड़ने लगे। उन्होंने सफल अभ्यर्थियों की उत्तर पुस्तिकाएं भी खूब पढ़ीं। वहां से उन्होंने सीखा कि सामान्य जवाब को प्रभावशाली कैसे बनाया जा सकता है इस मेहनत का असर साफ दिखाई दिया। मानवशास्त्र में उनके अंक पहले की तुलना में काफी बढ़ गए। उन्होंने अपने उत्तरों में वर्तमान घटनाओं के उदाहरण भी जोड़ने शुरू किए, जिससे जवाब ज्यादा मजबूत हो गए।साक्षात्कार के दौरान एक ऐसा पल भी आया जिसे आशीष आज तक नहीं भूले। साक्षात्कार मंडल के एक सदस्य ने उनसे कहा कि उनका जन्मदिन भगवान राम से जुड़ा माना जाता है। उन्होंने मुस्कुराते हुए कहा कि इसका परीक्षा से कोई संबंध नहीं है, वे सिर्फ उन्हें खुश करना चाहते थे। तनाव भरे माहौल में यह छोटा-सा पल आशीष के चेहरे पर मुस्कान ले आया। हालांकि उनसे उनके गृह जिले मुरैना और वहां के डकैतों के इतिहास को लेकर भी सवाल पूछे गए। लेकिन - उन्होंने हर सवाल का शांत और संतुलित जवाब दिया।आशीष के लिए यह सिर्फ पढ़ाई की लड़ाई नहीं थी। यह एक भावनात्मक संघर्ष भी था। वे कहते हैं कि मां को खोने का दर्द कभी खत्म नहीं हुआ। शायद यही वजह रही कि अफसर बनने का सपना उनके दिल में और गहराई से बसता गया। हर असफलता के बाद वे टूटे जरूर, लेकिन रुके नहीं।यूपीएससी सिविल सेवा परीक्षा में १८६वीं रैंक लाना यह एक बेटे की वर्षों की मेहनत, संघर्ष और मां से किए गए वादे की कहानी है। ६ साल की कठिन मेहनत, ५ प्रयास और कई असफलताओं के बाद आखिरकार आशीष शर्मा ने वह सपना पूरा कर दिखाया, जो कभी उनकी मां ने देखा था।

# शेफ संजीव कपूरांचा नाष्ट्याला पोहे न खाण्याचा सल्ला?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्रसिद्ध शेफ संजीव कपूर यांच्या मते, पोहा हा पदार्थ जितका हेल्दी समजला जातो, तितका तो प्रत्यक्षात नाही. ते सांगतात की, जर पांढरा तांदूळ आरोग्यासाठी फारसा चांगला नसेल, तर त्यावर प्रक्रिया करून बनवलेला पोहा आरोग्यासाठी अधिक हानिकारक ठरू शकतो. पोह्यामध्ये कार्बोहायड्रेट्सचे प्रमाण जास्त असल्याने तो खाल्ल्यावर शरीरातील रक्तातील साखरेची पातळी वेगाने वाढते.सकाळी नाश्त्यात पोहे खाणे म्हणजे तुमच्या शरीरातील इन्सुलिनच्या पातळीशी खेळण्यासारखे आहे.पोहा आणि सोबतीला जलेबी खाणे हे आरोग्यासाठी अत्यंत घातक असून अशा प्रकारचा नाश्ता पूर्णपणे टाळला पाहिजे. केवळ कम्फर्ट फूड किंवा चविष्ट पदार्थ म्हणून पोह्याकडे पाहणे ठीक आहे, पण त्याला डाएट फूड किंवा अतिशय हेल्दी समजणे हा एक भ्रम आहे. संजीव कपूर यांच्या मते, पोहा हा ओव्हरेटेड पदार्थ असून त्यातून मिळणारे पोषण पांढऱ्या तांदळाच्या तुलनेतही कमी असू शकते.




# स्वावलंबी शिक्षण : डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

स्मृतिदिन विशेष

डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील (२२ सप्टेंबर १८८७ ९ मे १९५९) हे महाराष्ट्रातील एक थोर समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ आणि रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक होते. बहुजन समाजातील मुलांना शिक्षणाची दारे उघडी करून देण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य अर्पण केले.भाऊराव पाटील यांनी ४ ऑक्टोबर १९१९ रोजी सांगली जिल्ह्यातील काळे येथे रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे मुख्य साधन आहे, अशी त्यांची धारणा होती.रयत शिक्षण संस्थेचे बोधचिन्ह वटवृक्ष ज्याप्रमाणे वडाच्या पारंब्या विस्तारतात, त्याप्रमाणे शिक्षण तळागाळापर्यंत पोहचावे, हे त्याचे प्रतीक आहे.त्यांचे ध्येयवाक्य स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद.भाऊराव पाटील यांनी गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी कमवा आणि शिका ही अत्यंत प्रभावी योजना सुरू केली.विद्यार्थ्यांनी स्वतःच्या श्रमातून शिक्षणाचा खर्च उचलावा आणि स्वावलंबी बनावे, हा त्यामागचा मुख्य उद्देश होता.या योजनेमुळे ग्रामीण भागातील हजारो गरीब मुले उच्च शिक्षण घेऊ शकली.भाऊराव पाटील हे महात्मा जोतिराव फुले आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांचे वारसदार होते.त्यांनी सातारा येथे १९२४ मध्ये छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस सुरू केले.या वस्तीगृहाचे खास वैशिष्ट्य म्हणजे येथे सर्व जाती-धर्माची मुले एकत्र राहत आणि एकाच पंगतीत जेवत. अस्पृश्यता निवारणाच्या दिशेने हे एक धाडसी पाऊल होते.त्यांच्या निस्वार्थी समाजसेवेमुळे आणि शैक्षणिक कार्यामुळे महाराष्ट्रातील जनतेने त्यांना अत्यंत प्रेमाने आणि आदराने 'कर्मवीर' (कार्यात वीर असलेला) ही पदवी बहाल केली. पुढे भारत सरकारने त्यांना १९५४ मध्ये पद्मभूषण पुरस्कार देऊन सन्मानित केले.कर्मवीरांनी स्वतःचे घरदार, दागिने आणि पत्नीचे (लक्ष्मीबाई पाटील) मंगळसूत्रदेखील संस्थेसाठी आणि विद्यार्थ्यांच्या जेवणासाठी खर्च केले. पुणे विद्यापीठाने त्यांना सन्माननीय डी.लिट पदवी देऊन गौरवले.त्यांनी मुष्टी फंड आणि गावोगावी हिंडून झोळी पसरून लोकवर्गणी गोळा केली आणि शाळा बांधल्या.शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि जो ते प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही, हा विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी कर्मवीरांनी महाराष्ट्राच्या मातीत शिक्षणाचे रोपटे लावले, ज्याचा आज महावृक्ष झाला आहे. ९ मे १९५९ रोजी या महामानवाचे निधन झाले.त्यांना ग्लोबल महातेज परिवाराच्या वतीने भावपूर्ण आदरांजली.



# असाही एक 'जमाना'...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ज्यांचा जन्म १९६०, १९६१, १९६२, १९६३, १९६४, १९६५, १९६६, १९६७, १९६८, १९६९, १९७०, १९७१, १९७२, १९७३, १९७४, १९७५, १९७६, १९७७, १९७८, १९७९, १९८०, १९८१, १९८२, १९८३, १९८४, १९८५, १९८६ , १९८७, १९८८, १९८९, १९९० साली झाला आहे. खास त्या पिढीसाठी हा लेख. ही पिढी आता वय वर्षे ३० ओलांडून वय वर्षे ६२ कडे चालली आहे. 'या' आपल्या पिढीचे सगळ्यात मोठे यश म्हणजे या पिढीने खूप मोठा बदल पाहिला आणि पचवला. आणि या पिढीची एक मोठी अडचण म्हणजे ही पिढी कायम उंबरठ्यावर राहिली. १,२,५,१०,२०,२५,५० पैसे बघितलेली ही पिढी पाहुण्यांकडून लाज न बाळगता पैसे घेत होती. शाई-बोरू/ पेन्सील/ पेन पासून सुरूवात करून ही पिढी आता स्मार्ट फोन, लॅपटॉप, कॉम्प्युटर उतारवयात सराईतपणे हाताळत आहे.

ज्या पिढीच्या बालपणी सायकलसुद्धा एक चैन असलेली, पण आता या उतारवयात सराईतपणे स्कूटर, कार चालवणारी ही पिढी, कधी अवखळ तर कधी गंभीर... खूप भोगलेली आणि खूप सोसलेली, पण पूर्ण संस्कारित. टेपरेकॉर्डर, पॉकेट ट्रांझीस्टर ज्या पिढीसाठी खूप मोठी मिळकत होती. मार्कशीट आणि टीव्हीच्या येण्याने यांच्या बालपणाचा बळी घेतला नाही, अशी ही शेवटची पिढी. कुकरच्या रिंग, टायर, असल्या गोष्टी घेऊन लहानपणी गाडी-गाडी खेळणे यात त्यांना काहीही कमीपणा वाटला नव्हता.

'सळई जमिनीत रुतवत जाणे' हा काही खेळ असू शकतो का? पण होता. 'कैऱ्या तोडणे' ही यांच्यासाठी चोरी नव्हती, आणि कुठल्याही वेळी कुणाचेही दार वाजवणे यामध्ये कसलेही इथिक्स तुटत नव्हते. मित्राच्या आईने जेवू घालणे यात कसलाही उपकाराचा भाव आणि त्याच्या बाबांनी ओरडणे यात कसलाही असूयेचा अभाव असणारी शेवटची पिढी. वर्गात किवा शाळेत स्वतःच्या बहिणीशी सुद्धा कुचरत बोलणारी ही पिढी.

दोन दिवस जरी मित्र शाळेत नाही आला, तर शाळा सुटल्या-सुटल्या दप्तरासकट त्याच्या घरापर्यंत जाणारी ती पिढी. कुणाचेही बाबा शाळेत आले की मित्र कुठेही खेळत असो. सत्तरच्या स्पीडने 'तुझे बाबा आलेय चल लवकर' ही बातमी मित्रापर्यंत पोहोचविणारी ती पिढी. पण गल्लीत कुणाच्याही घरात कसलाही कार्यक्रम असला, तरी वाट्टेल ते काम कसलाही विधिनिषेध न बाळगता करणारी ही पिढी. कपिलदेव, सुनील गावसकर, वेंकट, प्रसन्नाच्या बॉलिंगवर आणि पेस, भूपती, स्टेफी ग्राफ, आगासी, सॅम्प्रसच्या टेनिसवर तर राज, देव, दिलीप ते राजेश, अमिताभ आणि धर्मेंद्र, जितेंद्रबरोबर नंतर बऱ्याच नवीन कलाकारांवर, अगदी आमिर, सलमान, शाहरुख, माधुरी, अनिलवर वाढलेली ही पिढी. भाड्याने व्हीसीआर आणून ४-५ पिक्चर पैसे गोळा करून एकत्र पाहणाऱ्या मित्रांची ही पिढी. लक्ष्या-अशोकच्या निर्व्याज विनोदावर हसलेली,



नाना, ओम पुरी, शबाना, स्मिता पाटील, गोविंदा, जग्गू दादा, वर्षा, सोनम, किमी, सोनाली हे कलाकार पाहिलेली पिढी. 'शिक्षकांचा मार खाणे' यात काहीही गैर नाही. फक्त घरी कळू नये. कारण 'घरात परत धुतात' ही भावना जपणारी पिढी. ज्यांच्या शिक्षकांवर आवाज चढवला नाही अशी पिढी. ना मोबाईल ना एसएमएस ना व्हॉट्सॲप. भेटण्यासाठी आतुरतेने वाट पाहणारी पिढ़ी. पंकज उधासच्या 'तुने पैसा बहोत कमाया इस पैसेने देस छुडाया' या ओळीला डोळे पुसणारी, दिवाळीच्या पाच दिवसांची कथा माहिती असणारी. लिव्ह इन तर सोडाच, लव मॅरेज म्हणजे फार मोठे डेरिंग समजणारी ही पिढी. अहो शाळेत आणि महाविद्यालयातही मुलींशी बोलणारी मुले ॲडव्हान्स समजली जाणारी पिढी.

### पुन्हा डोळे झाकूया?

दहा, वीस, ऐंशी, नव्वद... पुन्हा जुना आठवणीचा सुवर्णकाळ. गेले ते दिवस, राहिल्या त्या आठवणी असे न समजणारी सुज्ञ पिढी. कारण आजचे दिवस हेच उद्याच्या आठवणी असणार, असे मानणारी ही पिढी?

धन्य ते जीवन. जे खरे जगण्याचा आमचाही एक जमाना होता. पूर्वी बालवाडी हा प्रकारच नव्हता. पुढे ६-७ वर्षानंतर स्वतःच शाळेत जावे लागत अस. जर शाळेत गेलो नाही तरी कोणाला काही वाटायचे नाही. सायकलने बसने पाठवायची पद्धत नव्हती. मुले एकटी शाळेत गेल्यास काही बरे-वाईट होईल, अशी भीती आमच्या आई-वडिलांना कधी वाटलीच नाही. पास/नापास हेच आम्हाला कळत होते. टक्क्यांचा आणि आमचा संबंध कधीच नव्हता. शिकवणी लावली, हे सांगायला लाज वाटायची. कारण 'ढ' असे हिनवले जायचे. पुस्तकामध्ये झाडाची पाने आणि मोरपीस ठेवून आम्ही हुशार होऊ शकतो, असा आमचा दृढविश्वास होता. कापडाच्या पिशवीत आणि नंतर चैन म्हणून पत्र्याच्या पेटीत पुस्तके आणि वह्या रचण्याचा शिरस्ता हे आमचे एक निर्मितीकौशल्य होते.

दरवर्षी जेव्हा नव्या इयत्तेचे दप्तर भरायचो त्या आधी, पुस्तके आणि वह्यांना कव्हर्स घालणे, हा आमच्या जीवनातील एक वार्षिक उत्सव असायचा. वर्ष संपल्यानंतर पुस्तके विकणे आणि विकत घेण्यात आम्हाला काहीही लाज वाटत नसे. आई-वडिलांना आमचे शिक्षण त्यांच्यावर फारसा बोजाही नव्हते. कोण्या मित्राच्या सायकलच्या पुढच्या दांड्यावर व दुसऱ्याला मागच्या कॅरीवर बसवून, आम्ही रस्तोरस्ती किती फिरलो हे आता आठवतही नाही. सरांचा शाळेत मार खाताना आणि पायांचे अंगठे धरून उभे राहताना, कान लाल होऊन पिरगळला जाताना आमचा 'ईगो' कधीही आडवा येत नव्हता, खरेतर आम्हाला 'ईगो' काय असतो हेच माहीत नव्हते. मार खाणे, ही आमच्या दैनंदिन जीवनातील एक सामान्य प्रक्रिया होती. मारणारा आणि मार खाणारा दोघेही खूश असायचे. मार खाणारा यासाठी की 'चला, कालच्यापेक्षा तरी आज कमी धोपटला गेलो म्हणून आणि मारणारा आज पुन्हा हात धुवून घ्यायला मिळाले म्हणून. विनाचपला, बुटांचे कोणत्याही चेंडू आणि लाकडी बॅटने वेळ मिळेल तेव्हा ग्राऊंडवर क्रिकेट खेळण्यातील काय सुख होते ते आम्हालाच माहीत होते. आम्ही पॉकेटमनी कधीच मागितला नाही, आणि वडिलांनी कधी दिलाही नाही. आमच्या म्हणून काही गरजाच नसायच्या. छोट्याशा असल्याच तर घरातील कोणीतरी पूर्ण करून टाकायचे. सहा महिन्यांतून कुरमुरे, फरसाण खायला मिळालाच तरी आम्ही बेहद खूश होतो. दिवाळीत लवंगी फटाक्यांची लड सुटी करून एकेक फटका उडवत बसणे यात काही अपमानास्पद आम्हाला वाटायचे नाही. कोणी दुसरा फटाके फोडत असेल, तर त्याच्या मागे-मागे धावायचो. आम्ही आमच्या आई-वडिलांना कधी सांगूच शकलो नाही की आम्ही तुमच्यावर किती प्रेम करतो, कारण आम्हाला 'आय लव यू' म्हणणे माहीतच नव्हते.

आज आम्ही असंख्य टक्के टोमणे खात, संघर्ष करत दुनियेचा एक हिस्सा झालो आहोत. काहींना जे हवे होते ते त्यांनी मिळवले तर काही 'काय माहीत ? शाळेतील ते डबल/ ट्रिपल सीटवर फिरवलेले आणि स्कूलबाहेरच्या त्या हापपॅन्टवाल्या गोळीवाल्याकडून काय-काय ज्या मित्राच्या कृपेने मिळायचे ते मित्र, कुठे हरवलेत ते? आम्ही जगात कुठेही असू. पण हे सत्य आहे, की आम्ही वास्तव दुनियेत जगलो आणि वास्तवात वाढलो. कपड्यांना सुरकुत्या पडू न देणे आणि नात्यांमध्ये औपचारिकता जपणे आम्हाला कधी जमलेच नाही. भाकरी आणि भाजीशिवाय मधल्या सुटीतील काही डबा असतो, हे आम्हाला माहीतच नव्हते. आपल्या नशिबाला चुकूनही दोष न देता आम्ही आनंदाने आजही स्वप्ने पाहतोय. कदाचित ते स्वप्नच आम्हाला जगायला मदत करतात. जे जीवन आम्ही जगलो त्याची वर्तमानाशी काहीही तुलना होणार नाही. आम्ही चांगले असू किंवा वाईट, पण आमचाही एक 'जमाना' होता.

# चांगली नाती का तुटतात?

## त्याचे कारण मोठी भांडणे नसून 'या' छोट्या सवयी असतात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कोणतेही नाते अचानक तुटत नाही. प्रेमाचा अंत नेहमीच आरडाओरडा किंवा दारे आपटून होत नाही, तर अनेकदा तो शांतपणे आणि हळूहळू होतो. मानसशास्त्रीय अभ्यासांनुसार नाती मोठ्या संकटांमुळे नाही, तर दैनंदिन जीवनातील दुर्लक्षित छोट्या सवयींमुळे विखुरतात. दोन व्यक्तींमधील संवाद आणि आदराचा अभाव जेव्हा वाढू लागतो, तेव्हा त्यांच्यातील अंतर वाढत जाते. 'पबमेड'मध्ये प्रसिद्ध झालेल्या संशोधनानुसार नात्यातील समाधान हे मोठ्या घटनांपेक्षा दैनंदिन संवादाच्या पद्धतीवर जास्त अवलंबून असते. एखाद्या मोठ्या भांडणापेक्षा दिवसातून शंभर वेळा होणाऱ्या छोट्या संभाषणांमधील सूर, एकमेकांना दिलेला वेळ आणि आदर यावर नात्याचे भवितव्य ठरते. नात्यात दुरावा येण्याचे प्रमुख कारण म्हणजे 'सततची टीका'. जेव्हा जोडीदाराच्या सतत चुका काढल्या जातात, तेव्हा भावनिक सुरक्षितता संपू लागते. परिणामी नात्यातील ऊब हरवते. कठीण विषयांवर बोलणे टाळल्याने मनात साचलेला राग अखेर कडवटपणात रूपांतरित होतो. अनेकदा जे बोलले जात नाही, त्याचा आवाज शब्दांपेक्षा मोठा असतो. केवळ शारीरिक उपस्थिती म्हणजे साथ नव्हे, तर जोडीदारासाठी भावनिकदृष्ट्या उपलब्ध असणे महत्त्वाचे असते. जोडीदारासमोर असतानाही सतत फोनमध्ये मग्न राहणे, ही एक गंभीर समस्या बनली आहे. डोळ्यांतील जिव्हाळ्याची जागा जेव्हा मोबाईलचे स्क्रीन्स घेतात, तेव्हा संवाद खुंटतो. याशिवाय, सोशल मीडियावरील इतरांच्या दिखाऊ आयुष्याशी आपल्या नात्याची तुलना केल्यानेही असंतोष वाढतो. मानसशास्त्रज्ञांच्या मते संवाद सुधारणे, एकमेकांचे आभार मानणे, भावनिक उपस्थिती आणि परस्पर आदर यातून कोमेजलेले नाते पुन्हा फुलवता येते.



शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोळा रोड, धुळे




# राहु काळात, का करू नये शुभ आणि नवीन कार्यांची सुरुवात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आज राहू बद्दल थोडी माहिती जाणून घेऊयात. चुकून जर राहू काळात सुरुवात झालीच असेल, तर काय करावे? प्रत्येक वारी कुठच्या वेळेत असतो राहू काल?

ज्योतिष मध्ये नवग्रहांना राशी, नक्षत्रांचे स्वामित्व दिले आहे, मात्र वार केवळ सात ग्रहांनाच दिले आहेत ते रवी पासून शनि पर्यंत. आपण रविवार ऐकले असेल पण राहुवार कधी एकला नसेल, शनिवार ऐकला असेल पण केतुवार ऐकला नसेल. मग राहू-केतू या दोन ग्रहांना वार का नाही दिले? या दोन ग्रहांचा काही वेळ नसतो का? याचं ज्योतिष मध्ये काय महत्व आहे? ज्योतिष मध्ये राहू आणि केतू यांना छाया ग्रह मानले आहे, म्हणजे वास्तवा मध्ये इतर ग्रहां प्रमाणे यांना आकाशीय पिंढ नाही, हे छाया ग्रह आहेत. म्हणून यांना वास्तविक शरीर नसल्याने यांना वास्तविक वार पण नाही दिला, मग यांचा काही काळ नसतो का?

हो राहुला तर काळ दिला आहे, प्रत्येक दिवशी एक निश्चिचित काळ राहुला दिला आहे. पण केतुला कूठचाही काळ दिलेला नाही. कारण केतू मोक्षाचा ग्रह मानला आहे, मुक्तीचा ग्रह सांगितला आहे हा. काळाच्या सीमेच्या परेग्रह आहे, हा काळ जो आहे जेथे जाऊन पूर्णतः काळ थांबला जातो, म्हणून केतुला मोक्षाचा ग्रह मानला आहे.

**राहुकाळ :** प्रत्येक वारी राहुचा काळ वाटून दिला आहे, प्रत्येक दिवशी दीड तासाचा काळ राहूसाठी निच्छित केलेला आहे, जो वेगवेगळ्या दिवशी वेगवेगळ्या वेळेत येतो, याला राहू काळ म्हणतात. राहू काळ चांगला काळ मानला जात नाही, अशी मान्यता आहे की, या काळात सुरू केलेले कोणतेही नवीन काम, कुठलीही नवीन यात्रा, नवीन दुकान, नवीन घर, नवीन व्यवसाय असेल तर शुभ फळ देत नाही. ते काम कधीच पूर्ण होत नाही, जे राहू काळात केले जाते.


राहू काळ कोणत्या वारी? केव्हा असतो?

१) रविवारी संध्याकाळी ४:३० पासून संध्याकाळी ६:०० पर्यंत.

२) सोमवारी सकाळी ०७:३० पासून सकाळी ०९:०० पर्यंत.

३) मंगळवारी दुपारी ०३:०० पासून संध्याकाळी ०४:३० पर्यंत.

४) बुधवारी दुपारी १२:०० पासून दुपारी ०१:३० पर्यंत.



५) गुरुवारी दुपारी ०१: ३० पासून दुपारी ०३:०० पर्यंत.

६) शुक्रवारी सकाळी १०:३० पासून दुपारी १२:०० पर्यंत.


०७) शनिवारी सकाळी ०९:०० पासून सकाळी १०:३० पर्यंत.

अश्या प्रकारे वेगवेगळ्या वेळेत राहुकाळ दिला आहे. ज्यांची राहूची महादशा चालू आहे आणि त्यांचा राहू कुंडलीत बिघडलेला असेल. तर या काळात कुठच्याही परिस्थितीत उपचारासाठी हॉस्पिटल मध्ये ॲडमिट होऊ नये किंवा कूठच्या कोर्ट केसच्या सुनावणीसाठी न्यायालयात जाऊ नये, अन्यथा अश्या स्थितीत मोठी समस्या निर्माण होईल. खूप कष्ट सहन करावे लागतील.

**राहू काळ, एवढा वाईट काळ का मानला आहे?**

कारण राहुला ज्योतिषा मध्ये उत्पातचा ग्रह मानला आहे, काम बिघडणारा ग्रह आहे, क्रूर, मायावी ग्रह आहे, ज्याने समुद्रमंथनाच्या वेळी माया जालाने अमृत प्राशन केले होते. राहू काळात सुरुवात केलेले काम पूर्णत्वाकडे जात नाही, असंख्य अडचणींना सामोरे जावे लागते. दक्षिण भारतात राहू काळावर खूप जोर दिला जातो, या काळात कुठलेही शुभ काम खास करून कोणतेही पूजन अर्चन किंवा नव्याची सुरुवात, कोणत्याही नवीन कामाची सुरवात म्हणजे नवी घर घ्यायचे असेल, नवीन गाडी असो, नवीन जॉब करायचा असेल अशी कोणतेही कामे आपण राहू काळात करू नये. आपण हा विचार कराल की आजच्या आधुनिक जगात, दीड तासासाठी कोणतेही नवीन काम अडवून ठेऊ का?हे कसे शक्य आहे? नाही आज हे शक्य नाही होत. तरीही याचा विचार आवश्य करावा, अडचण असेल तर मग राहूकाळा मध्ये आपण काय करू शकतो? राहु काळात आपण कोणती कामे सुरू करू शकता?

राहुकाळामध्ये आपण जी कामे करू शकता, ती नैसर्गिक रित्या डीस्ट्रकटीव्ह आहेत, जसे कोणत्या वस्तूची विक्री करणे, आपल्या पासून दूर घालवणे, कुठचा अशा कामाची सुरवात करणे ज्यात तोडफोड असेल, असे सामान काढणे जे नको असलेल काढून टाकणे. कुठलेही सामान आपणास विकायचे असेल, काढायचे असेल, कुठचेही सामान तोडत आहोत, निगेटिव गोष्टींपासुन होत असलेला त्रास नष्ट करण्याची कामे, जी राहुच्या कारक तत्वात येतात, अशी सर्व कामे राहू काळात चांगल्या प्रकारे पूर्ण होतात. ज्यांची राहूची महादशा चालू आहे आणि राहू कुंडलीत अशुभ आहे अशुभ फलित होत असेल. तर त्यांनी या राहू काळात राहू जप मंत्र केल्यास राहू पासून शुभ फळ प्राप्ती होते. अडचणीने आणि नाईलाजाने जर आपल्याला कोणतेही काम सुरू करावे लागत असेल किंवा चुकून झाले असेल, तर आपण त्यासाठी हनुमंताचा जप करावा आणि गूळ, चणा आणि पाणी ग्रहण करावे. ज्योतिषा मध्ये मुहूर्ताला खूप महत्व आहे, शुभ मुहूर्तात केलेले काम सफलता नक्कीच देते. देव पण उचित मुहूर्त नियोजित करूनच अवतार घेतात, प्रभू श्री राम आणि भगवान श्रीकृष्ण अभिजीत मुहूर्तावर प्रकट झाले होते, हा अत्यंत शुभ मुहूर्त असतो. आता राहू मुहूर्ताचा शत्रू आहे, जो शुभ मुहूर्त नष्ट करतो. म्हणूनच राहू काळात कधीही विवाह, मुंज या सारखे सर्वच शुभकार्य वर्ज केले आहेत, राहू काळात जर आपणास नाईलाजाने यात्रा करावीच लागत असेल. तर एक जुना उपाय आवश्य करावा, काही लोक याला अंधश्रद्धा म्हणतील, असे उपाय आपली जुनी माणसे करत होती. पण हे खरोखरच तेवढेच प्रभावशालीही मानले आहेत आणि परंपरागत मिळाले आहेत, जसे राहुकाळात यात्रा करायचीच असेल तर आपल्या घरातील एखादी वस्तु किंवा रुमाल वगैरे बाहेर ठेवा.म्हणजे यात्रा सुरुवात झाली असे होईल, यावर आपण प्रवासासाठी गेला तर राहु कालाचा दोष लागत नाही. अशी मान्यता आहे, तर राहू काळात अश्या प्रकारे दक्षता आवश्य घ्यावी. कोणतेही शुभकार्य करू नये, नवीन कार्य सुरू करू नये, महत्वाची कागदपत्रे आणि व्यवहार करू नयेत...



# नाथभक्त कोण ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नाथभक्त कोण ? तर जो कधीही नाथांच्या विचारांपासून दूर जात नाही. तो भक्त नाथांप्रमाणे आचरण करतो, तो नाथभक्त. नवनाथांनी आपल्या जीवनामध्ये भोळसट रुढी, अंधश्रद्धा यांना कधीही स्थान दिले नाही. ते नाथ योगी आणि रुद्राक्षधारी होते. प्राणिमात्रावर दया करायला नाथांनी सांगितले. तेव्हा आपणसुद्धा नाथांप्रमाणेच दयाळू अंतःकरणाने प्राणिमात्रांवर दया केली पाहिजे.

आजसुद्धा काही तीर्थक्षेत्रांमध्ये नाथांच्या नावाने पशुहत्या केली जाते. आपण अशा निरपराध कोंबड्या, बकऱ्यांचा बळी घेतो, तो केवळ आपल्या जिभेचे चोचले पुरविण्यासाठीच. तेव्हा अशा कृत्याने नाथ कधीही प्रसन्न होणार नाहीत. ही प्रथा हळूहळू बंद करण्याचा आपण सर्व नाथभक्तांनी प्रयत्न करण्याची गरज आहे, जेणेकरुन नाथ माऊलीला दुःख होईल असे कोणतेही कृत्य आम्ही करणार नाही असा निर्धार सर्व नाथभक्तांनी केला पाहिजे.

भगवंताला प्रेमाने फ त्त पुष्प फल जरी अर्पण केले तरी ती देणगी भगवंत स्वीकारतात. तेव्हा आपण सर्वांनी नाथांनी सांगितलेल्या मार्गाने चालून आपल्या जीवनाचा उद्धार करून घ्यायचा आहे.

**धन्य ती भूमी जिथे वास्तव्य तुझे। धन्य ती लेकरे जे शिष्य तुझे।**
**धन्य ती मढी ज्या स्थानी राहसी। धन्य जे दुःखी ते तव सेवेसी ।**
**धन्य मज करी। कानिफनाया आलो द्वारी ।।**

# क्या आपको इन १६ अति महत्वपूर्ण वैदिक मंत्रोकी जानकारी है?

**१) श्री गायत्री मंत्र**
ॐ भूर्भुवः स्वः,
तत्सवितुर्वरेण्यम्
भर्गो देवस्य धीमहि
धियो यो नः प्रचोदयात् ॥

**२) श्री महादेव**
ॐ त्रम्बकं यजामहे,
सुगन्धिं पुष्टिवर्धनम् ,
उर्वारुकमिव बन्धनान्,
मृत्योर्मुक्षीय मामृतात् !!

**३) श्री गणपती**
वक्रतुंड महाकाय,
सूर्य कोटि समप्रभ
निर्विघ्नम कुरू मे देव,
सर्वकार्येषु सर्वदा !!

**४) श्री हरी विष्णु**
मङ्गलम् भगवान विष्णुः,
मङ्गलम् गरुडध्वजः।
मङ्गलम् पुण्डरी काक्षः,
मङ्गलाय तनो हरिः॥

**५) श्री ब्रम्ह**
ॐ नमस्ते परमं ब्रह्मा,
नमस्ते परमात्मने ।
निर्गुणाय नमस्तुभ्यं,
सदुयाय नमो नमः।।

**६) श्रीकृष्णा**
वसुदेवसुतं देवं,
कंसचाणूरमर्दनम्।
देवकी परमानन्दं,
कृष्णं वन्देजगद्गुरुम्।

**७) श्रीराम मंत्र**
श्री रामाय रामभद्राय,
रामचन्द्राय वेधसे ।
रघुनाथाय नाथाय,
सीताया पतये नमः !

**८) दुर्गा मंत्र**
ॐ जयंती मंगला काली,
भद्रकाली कपालिनी ।
दुर्गा क्षमा शिवा धात्री,
स्वाहा स्वधा नमोऽस्तुते।।

**९) श्री महालक्ष्मी**
ॐ सर्वाबाधा विनिर्मुक्तो,
धन धान्यः सुतान्वितः ।
मनुष्यो मत्प्रसादेन,
भविष्यति न संशयःॐ ।

**१०) आई सरस्वती**
ॐ सरस्वति नमस्तुभ्यं,
वरदे कामरूपिणि।
विद्यारम्भं करिष्यामि,
सिद्धिर्भवतु मे सदा ।।

**११) जय महाकाली**
ॐ क्रीं क्रीं क्रीं,
हलीं ह्रीं खं स्फोटय,
क्रीं क्रीं क्रीं फट !!

**१२) श्री हनुमान**
मनोजवं मारुततुल्यवेगं,
जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठं।
वातात्मजं वानरयूथमुख्यं,
श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये॥

**१३) श्री शनिदेव**
ॐ नीलांजनसमाभासं,
रविपुत्रं यमाग्रजम ।
छायामार्तण्डसम्भूतं,
तं नमामि शनैश्चरम्।।

**१४) श्री कार्तिकेय**
ॐ शारवाना-भावाया नमः,
ज्ञानशक्तिधरा स्कंदा ,
वल्लीईकल्याणा सुंदरा।
देवसेना मनः कांता,
कार्तिकेया नामोस्तुते।

**१५) कालभैरव**
ॐ ह्रीं वां बटुकाये,
क्षौं क्षौं आपदुद्धाराणाये,
कुरु कुरु बटुकाये,
ह्रीं बटुकाये स्वाहा।

**१६) भारत माता**
नमस्ते सदा वत्सले मातृभूमे
त्वया हिन्दुभूमे सुखद्
वर्धितोऽहम्
महामङ्गले पुण्यभूमे त्वदर्थे
पतत्वेष कायो नमस्ते-नमस्ते।।

# डाव्या व उजव्या सोंडेचा गणपती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्रत्येक गणेशभक्त गणपती घेत असताना डाव्या व उजव्या सोंडेचा गणपती पाहून घेतो. त्यामागचे शास्त्र काय ते आपण
या लेखात पाहू.डाव्या सोंडेच्या गणपतीकडे पहिल्यास चांगले वाटते. असाएक समज आहे, की सोंडेचे टोक उजवीकडे असलेली मूर्ती म्हणजे उजव्या सोंडेची मूर्ती आणि सोंडेचे टोक डावीकडे असणारी मूर्ती म्हणजे डाव्या सोंडेची, पण हे चूक आहे. सोंडेचे सुरवातीचे वळण कोणत्या बाजूकडे आहे.
यावरून ठरवावे. गणेशमूर्तीतील सोंडेचे पहिले वळण जर उजवीकडे असेल व सोंडेचे तोंड डाव्या बाजूकडे वळलेले असेल, तरीही ती मूर्ती उजव्या सोंडेची आहे, असे समजावे.



**उजवी सोंड :** उजव्या सोंडेच्या गणपतीची मूर्ती म्हणजे दक्षिणाभिमुखी मूर्ती. दक्षिण म्हणजे दक्षिण दिशा किंवा उजवी बाजू.दक्षिण दिशा यमलोकाकडे नेणारी, तर उजवी बाजू सूर्यनाडीची आहे.यमलोकाच्या दिशेला जो तोंड देऊ शकतो तो शक्तिशाली असतो.सूर्यनाडी चालू असलेला तेजस्वीही असतो. दक्षिणेला असलेल्या यमलोकात पाप पुण्याची छाननी होते.म्हणून ती बाजू नकोशी वाटते. मृत्यूनंतर जशी छाननी होते, तसे मृत्यूपूर्वी दक्षिणेकडे तोंड करून बसल्यास छाननी होते.दक्षिणाभिमुख मूर्तीची पूजा नेहमी सारखी केली जात नाही.अशा मूर्तीची पूजा कर्मकांडातील पूजाविधीचे सर्व नियम काटेकोरपणे पाळून केली जाते.
त्यामुळे सात्विकता वाढते व दक्षिणेकडून येणाऱ्या रजलहरीचा त्रास होत नाही.


**डावी सोंड :** डाव्या सोंडेचा गणपती म्हणजे वाममुखी गणपती.वाम म्हणजे डावी दिशा किवा उत्तर बाजू. डाव्या बाजूला चंद्रनाडी आहे ती शीतलता देते.उत्तर बाजू आध्यात्माला पूरक आहे.आनंददायी आहे. म्हणून बहुधा वाममुखी गणपती पूजेत ठेवतात.याची पूजा नेहमीच्या पद्धतीने केली जाते.

# गणरायाला दुर्वा प्रिय होण्याचे कारण?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एकदा मायावी शक्तीपासून अनलासुर नावाचा भयानक असुर उत्पन्न झाला. त्याच्या कानठळया बसविणाऱ्या आवाजाने पृथ्वीचाही थरकाप उडत होता.

त्याचे डोळे लालबुंद होते. त्यांतून अग्नीच्या ज्वाळा निघत होत्या. त्याच्या वाऱ्यालाही कोणी उभे राहत नव्हते. या अनलासुराने देवांनाही दे माय धरणी ठाय करून सोडले होते. संपूर्ण देवलोक ह्या राक्षसाच्या अत्याचारामुळे भयभीत झाले होते.अखेर सर्व देव गणरायाला शरण गेले. त्यांनी गणरायाचा धावा करताच गणराया बालरूपात प्रकट झाला.गणरायाने देवांना अनलासुरापासून भयमुक्त करण्याचे अभिवचन दिले. अनलासुराविरूध्द युध्द पुकारले.अनलासुराने बालरूपी गणरायाला गिळण्याचा प्रयत्न केला, परंतु गणरायाने विराट रूप धारण करून अनलासुरालाच गिळंकृत केले. त्या राक्षसाचा नाश तर झाला पण इकडे गणरायांच्या अंगाची लाही लाही होऊ लागली. ते गडबडा लोळू लागले.त्यांच्या सर्वांगाला चंदनाचा लेप दिला. तरीही दाह काही थांबेना. तेव्हा देवांनी त्यांच्या डोक्यावर चंद्राची स्थापना केली. त्यामुळे श्री गणपतीला भालचंद्र असे नाव पडले. विष्णूने आपल्या हातातील कमळ त्याच्या हाती दिले त्यामुळे त्यांना पद्मपाणी असे नाव मिळाले.
श्री भगवान शंकराने आपल्या गळयातील नाग



गणरायाच्या कमरेला बांधला. वरूणाने गणरायाच्या सर्वांगावर पाण्याचा अभिषेक केला तरी अंगाची लाही काही थांबेना. गणराया बिचारा तळमळत जमिनीवर लोळत होते.इतक्यात काही ऋषीमुनी तेथे आले. प्रत्येकाने एकवीस-एकवीस दुर्वांची जुडी गणरायाच्या मस्तकावर ठेवली आणि चमत्कार झाला.गणरायाला तात्काळ बरे वाटले. त्याच्या अंगाची आग शांत झाली.

गणराया आनंदून म्हणाले, माझ्या अंगाची लाही शांत होण्यासाठी सर्व देवांनी नानाविध उपाय केले, परंतु दुर्वांनी माझ्या अंगाचा दाह कमी झाला. यापुढे जो मला भक्तिभावाने दुर्वा अर्पण करेल त्याला हजारो यज्ञयाग, व्रतं आणि तीर्थयात्रा केल्याचे पुण्य लाभेल.

# कर्जाच्या फेऱ्यात अडकला आहात? मग हे सात उपाय करुन पाहा, कर्जमुक्त झालात म्हणून समजा!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तुम्हीही कर्जामुळे त्रस्त असाल तर. कष्ट करूनही कर्जमुक्ती होत नाही.म्हणून ज्योतिष शास्त्रात काही उपाय सांगण्यात आले आहेत, ज्याचा अवलंब करून तुम्ही या समस्यांपासून सहज सुटका मिळवू शकता.मंगळवारी शिवमंदिरात जाऊन शिवलिंगाला दूध आणि



पाण्याने अभिषेक करा आणि मसूर अर्पण करा. त्यानंतर तेथे बसून ऋन्मुक्तेश्वर मंत्र ओम रिंमुक्तेश्वर महादेवाय नमः चा १०८ वर जप करा.प्रत्येक मंगळवार आणि शनिवारी हनुमानजींना तेल वाहावे. यासोबत हनुमान चालीचा पाठ करा. असे केल्याने कर्जाची समस्या दूर होते.रात्री शेजारी एका भांड्यात बार्ली भरून ठेवा. सकाळी उठल्यावर आंघोळ करून जवळच्या कोणत्याही गरजूला दान करा. असे केल्याने धनाशी संबंधित समस्या हळूहळू संपतात. कर्जातून मुक्ती मिळाल्याने परिस्थितीही मजबूत होते.मूग उकळून त्यात तूप साखर मिसळून गायीला खाऊ घातल्यास कर्जातून लवकर सुटका होते.माकडांना गूळ-हरभरा आणि केळी, गायीला भाकरी, माशांना पिठाच्या गोळ्या आणि पक्ष्यांना धान्य दिल्यास कर्जमुक्ती होते.वास्तुनुसार ईशान्य कोपरा स्वच्छ आणि स्वच्छ ठेवा, असे केल्याने कर्जातून लवकर मुक्ती मिळते.

# अधिक मास कधीपासून सुरू होणार? या विशेष महिन्यात काय करावे, काय करू नये?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ज्येष्ठ अधिक मास हा आध्यात्मिक शुद्धीकरणाचा काळ आहे. अधिक मास भक्ती, आध्यात्मिक साधना आणि दानधर्मासाठी अत्यंत शुभ मानला जातो. मात्र या काळात शुभ कार्ये करण्यास मनाई आहे.अधिक मास हा आध्यात्मिक शुद्धीकरणाचा महिना असतो.जप, तप, दानधर्मासाठी अत्यंत शुभ काळ असतो.
यावर्षी अधिक मासाचा विशेष योग जुळला असून हा महिना धार्मिक आणि आध्यात्मिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. या महिन्यात केलेल्या कर्मांचे फळ अनेक पटींनी वाढते. हिंदू पंचांगानुसार जेव्हा एकच चंद्र मास दोनदा येतो तेव्हा पहिल्याला अधिक मास आणि दुसऱ्याला शुद्ध मास म्हणतात. चंद्र आणि सौर वर्षांमध्ये संतुलन राखण्यासाठी अधिक मास



दर तीन वर्षांनी एकदा येत असते.या महिन्याला मलमास किंवा पुरुषोत्तम मास म्हणूनही ओळखला जातो. हा महिना भगवान विष्णूला समर्पित आहे. नकारात्मकतेला तुमच्या जीवनावर प्रभाव टाकण्यापासून रोखण्यासाठी या महिन्यात काही नियमांचे पालन केले गेले पाहिजे.

**अधिक मास कधी सुरू होईल?**

हा विशेष महिना रविवार १७ मे २०२६ रोजी सुरू होईल आणि सोमवार, १५ जून २०२६ पर्यंत चालेल. यानंतर शुद्ध ज्येष्ठ महिना सुरू होईल. हा महिना १३ जुलै २०२६ पर्यंत असेल. हा काळ धार्मिक कार्यांसाठी अत्यंत फलदायी मानला जातात.

**अधिक मासात काय करावे?**

या पवित्र महिन्यात भगवान विष्णूच्या उपासनेला विशेष महत्त्व आहे.ओम नमो भगवते वासुदेवाय या मंत्राचा जप केल्याने मानसिक शांती आणि पुण्य लाभ मिळते.दानधर्मात तुम्ही वस्त्र आणि दीपदान करणे अत्यंत शुभ मानले जाते.श्रीमद् भागवत कथा आणि गीतेचे पठण केल्याने आध्यात्मिक प्रगती होते.पवित्र नद्यांमध्ये स्नान करणे किंवा घरी गंगाजलाने स्नान करणे देखील लाभदायक मानले जाते.या काळात सद्गुणी जीवन आणि आध्यात्मिक साधना केल्याने आध्यात्मिक शुद्धीकरण होते.

**अधिक मासात काय करू नये?**

अधिक मासात विवाह, साखरपुडा, मुंडन विधी, जानवे घालणे किंवा गृहप्रवेश यांसारखे कोणतेही शुभ कार्य करू नये.या काळात नवीन व्यवसाय सुरू करणे किंवा नवीन नोकरी जॉईन करण्यासह हा महिना उचित मानला जात नाही.मालमत्ता, वाहने किंवा घरांसंबंधी नवीन खरेदी देखील टाळावी.मांस, मद्य, लसूण आणि कांदा यांसारख्या तामसिक पदार्थांचे सेवन करण्यास मनाई आहे.या काळात उपवास सुरू किंवा समाप्त करू नये. तसेच खोटे बोलणे, वाद घालणे आणि इतरांचा अपमान करणे टाळणे महत्त्वाचे आहे, कारण यामुळे आपले नाते खराब होऊ शकते.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)